पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६०६/२०१८
दिनांक : १४/०९/२०१८

प्रति,

मा.......................................
सदस्य, शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा दिनांक **२१/०९/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२१/०९/२०१८** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शिक्षण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ०६**

**दिनांक : २१/०९/२०१८** **वेळ : दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२१/०९/२०१८** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **०६/०९/२०१८ व १०/०९/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०५**) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाचे माहे ऑगष्ट २०१८ व ११ सप्टेंबर २०१८ आखेरचे १० शासन निर्णय अवलोकनार्थ तसेच वाचन व चर्चेकामी शिक्षण समितीपुढे सादर करणे आवश्यक असलेने प्रस्तावा सोबतचे महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाचे माहे ऑगष्ट २०१८ व ११ सप्टेंबर २०१८ अखेरचे १० शासन निर्णयाचे अवलोकन करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागा अंतर्गत मराठी, उर्दू, हिंदी, इंग्रजी माध्यमाच्या एकूण १०५ शाळा असून या शाळांच्या एकूण ८८ इमारती आहेत. तसेच खाजगी शाळा, अनुदानीत शाळा, कायम विनाअनुदानीत शाळा, स्वंयम अनुदानीत शाळा या शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांना मनपा अंतर्गत सर्व शाळांची वार्षीक तपासणी करुन तपासणी अहवाल कार्यालयास सादर करणे, शाळा तक्रारीबाबत पंचनामा करुन अहवाल कार्यालयास सादर करणे, मनपा/ खाजगी शाळांचे पूर्तता करुन २५ टक्के प्रवेश पात्र शाळा/विदयार्थी यादी करुन त्यांना प्रवेश मिळवून, युडाईस फॉर्म भरुन घेणे मनपा/खाजगी इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत५०टक्के फॉर्म चेक करणे, १०वी/१२वी परिक्षा भरारी पथकात काम करणे, मनपा/खाजगी शाळेतील शिक्षक मुख्याध्यापक यांचे प्रशिक्षणसंदर्भात नियोजन व नियंत्रण करणे, गोपनिय अहवाल भरुन घेणे, शाळेचे साहीत्य शाळेला पोहच झाले विदयार्थ्यांना योग्य साहीत्य प्राप्त झालेचा अहवाल देणे कार्यालयाने दिलेल्या सुचनानुसार शाळे संदर्भात कार्यवाही करणे, विदयार्थी गुणवत्ता वाढीसाठी विविध कार्यक्रम राबविणे, शाळेत वेळापत्रकानुसार तास घेतात का याबाबत खात्री करणे,शाळेतील पोषण आहार गुणवत्ता दर्जा तपासणे, सर्व विद्यार्थ्यांना आहार

मिळतो का ते पाहणे, शालेय मुख्याध्यापकास रेकॉर्ड अदयावत ठेवण्यास मार्गदर्शन करणे, विषयतज्ञ व मुख्याध्यापक यांच्यावर नियंत्रण ठेवून विदयार्थी गुणवत्तावाढ करणे, इत्यादी कामकाजास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाअंतर्गत सर्व माध्यमाच्या एकुण 105 शाळा कार्यरत आहेत. शैक्षणिक वर्ष सन 2017-18 रोजीची पटपडताळणी प्राप्त झाली असून सदरच्या पटपडताळणीनुसार/शासन निर्णय क्र.एम.एस.बी.2006/(301/06) प्राशि 2 दिनांक 26/09/2007 नुसार मनपा प्राथमिक शाळांमध्ये मान्य पदांपेक्षा तसेच विद्यार्थी पटसंख्येनुसार आवश्यकतेपेक्षा जास्त असणा-या शिक्षकांचे समायोजन करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) मा.नगरसेविका सौ.अश्विनी गजानन चिंचवडे यांचे दि.१४/०९/२०१८ चे पत्र व संस्कृती संवर्धन व विकास महासंघाचे विभाग प्रमुख श्री.डॉ.अजित जगताप यांचेकडील दिनांक १०/०९/२०१८ च्या प्राप्त पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागा अंतर्गत मनपा शाळांमध्ये पहिला व तिसरा शनिवार दप्तराविना शाळा उपक्रम राबविला जातो. त्या अंतर्गत त्या दिवशी विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षा मिळावी व योग प्राणायामातुन शरीर, मन सक्षम होऊन चांगले संस्कार व्हावेत म्हणून मोफत प्रकल्प राबवू इच्छितात या कामकाजास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६०६/२०१८
दिनांक : १४/०९/२०१८ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.